RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ६२] शनिवार, ऑक्टोबर १, २०१६/आश्विन ९, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक १०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Universities (Temporary postponement of elections and *ad-hoc* formation of university authorities and other bodies) Ordinance, 2016 (Mah. Ord. XXV of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. MALI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Universities (Temporary postponement of elections and *ad-hoc* formation of university authorities and other bodies) Ordinance, 2016 (Mah. Ord. XXV of 2016), published under the authority of the Governor].

---

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 1st October 2016.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXV OF 2016.**

*AN ORDINANCE*

*to provide for temporary postponement of elections of members of authorities and bodies of the non-agricultural and non-technological Universities and ad-hoc formation of said authorities and bodies by nomination and co-option.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS with a view to strengthen the non-agricultural and non-technological Universities in the State of Maharashtra and make them able to improve the quality of higher education and research, the Government of Maharashtra has introduced L. A. Bill No. XVI of 2016 in the Maharashtra Legislative Assembly and proposed to repeal the Maharashtra Universities Act, 1994 ;

Mah. XXXV of 1994.

AND WHEREAS the said Bill has referred to the Joint Committee of both Houses of the State Legislature;

AND WHEREAS in the largest interest of the students, it is considered expedient to provide for formation of the authorities and bodies of the universities by nomination and co-option of members to carry out the functions of the universities;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immmediate action to provide for temporary postponement of elections of members of authorities and bodies of the non-agricultural and non-technological [illegible] *ad-hoc* formation of said authorities and bodies by nomination and co-option;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commence-ment.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Universities (Temporary postponement of elections and *ad-hoc* formation of university authorities and other bodies) Ordinance, 2016.

(*2*) It shall come into force at once.

Temporary postponement of elections and *ad-hoc* formation of university authorities and bodies.

**2.** (*1*) Notwithstanding anything contained in the Maharashtra Universities Act, 1994 (hereinafter referred to as " the Universities Act "), but subject to the provisions of sections 43 and 44 or any Statutes made thereunder,— Mah. XXXV of 1994.

(*a*) no elections, to the universities mentioned in the Schedule of the Universities Act, for filling of vacancies, caused in any manner whatsoever, of any of the elected members of any of the authorities or bodies of such university, shall be held till the constitution of new authorities and bodies under the proposed new university law or till the 31st August 2017, whichever is earlier;

(*b*) the nomination of the members on the vacant posts of the various authorities and bodies of the universities shall be made as per the respective provisions of the Universities Act ;

(*c*) the co-option of the members on the vacant posts of the various authorities and bodies of the universities shall be made as per the respective provisions of the Universities Act.

(*2*) The members nominated and co-opted as provided in clauses (*b*) and (*c*) of sub-section (*1*) shall hold the posts until new authorities and bodies constituted under the proposed new university law or till the 31st August 2017, whichever is earlier.

*Explanation.*— For the purpose of this Ordinance, the expression " proposed new university law " means the enactment proposed under the Maharashtra Universities Bill, 2016 (L. A. Bill No. XVI of 2016).

**3.** Notwithstanding anything contained in the Universities Act, or any statutes made thereunder, no act or proceedings of any authority or any other body of any of the universities, during the said period shall be invalid merely on the ground that the vacancies occurring on any such authority or body required to be filled in by election are not so filled in. Consequences of temporary postponement of elections of members of authorites and other bodies of the university.

Mah. XXIX of 2015. **4.** The Maharashtra Universities (Temporary postponement of elections of members of university authorities and other bodies) Act, 2015, is hereby repealed. Repeal of Mah. XXIX of 2015.

## STATEMENT

The Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994) (hereinafter referred to as " the Universities Act ") provides for constitution of various authorities and bodies of certain non-agricultural and non-technological universities in the State of Maharashtra, consisting of elected, nominated and co-opted members. Section 42(*1*) of the said Act provides that the term of every authority shall commence on the 1st September and shall be of five years, irrespective of the date on which member has entered upon his office.

2. With a view to strengthen the non-agricultural and non-technological Universities in the State of Maharashtra and make them able to improve the quality of higher education and research, the Government of Maharashtra has introduced L. A. Bill No. XVI of 2016 in the Maharashtra Legislative Assembly and proposed to repeal the Maharashtra Universities Act, 1994. However, the Legislative Assembly has referred the said Bill to the Joint Committee of the State Legislature. It is expected that, the Bill referred to the Joint Committee would come for consideration in the Winter Session of the State Legislature in 2016. On enactment of the new law, the authorities and bodies of the universities will be required to be constituted in accordance with the provisions of such new law.

3. In view of the said proposed law, the election to the authorities and bodies of the universities was temporarily postponed upto the 31st August 2016 by the Maharashtra Universities (Temporary postponement of elections of members of university authorities and other bodies) Act, 2015 (Mah. XXIX of 2015). Since, the process of enactment of new law could not be completed before the 31st August 2016, keeping in view the larger interest of the students, the Government considers it expedient to postpone the elections of the authorities and bodies of the universities and *ad-hoc* formation of the said authorities and bodies by nomination and co-option as per the respective provisions of the Universities Act, to carry out the functions of the university.

4. Both houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to make a law, for the aforesaid purposes, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 28th September 2016.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SITARAM KUNTE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३८] शनिवार, ऑक्टोबर १, २०१६/आश्विन ९, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ६०

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.—** कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीकरणाद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे तदर्थ घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अध्यादेश. | १–३ |

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २०१६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXV OF 2016.**

AN ORDINANCE

TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS OF MEMBERS OF AUTHORITIES AND BODIES OF THE NON-AGRICULTURAL AND NON-TECHNOLOGICAL UNIVERSITIES AND *AD-HOC* FORMATION OF SAID AUTHORITIES AND BODIES BY NOMINATION AND CO-OPTION.

**सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.**

**कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीकरणाद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे तदर्थ घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या आणि उच्च शिक्षणाचा व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांना समर्थ बनविण्याच्या हेतूने, महाराष्ट्र शासनाने सन २०१६
१९९४ चा चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ हे, महाराष्ट्र विधानसभेत मांडले आहे आणि त्याद्वारे महाराष्ट्र विद्यापीठ
महा. ३५. अधिनियम, १९९४ निरसित करण्याचे प्रस्तावित केले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त विधेयक राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी, विद्यापीठाची कार्ये पार पाडण्याकरिता नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीकरणाद्वारे विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे घटित करणेबाबत तरतुदी करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीकरणाद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे तदर्थ घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र विद्यापीठ (निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे आणि विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे तदर्थ घटित करणे) अध्यादेश, २०१६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे आणि विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे तदर्थ घटित करणे.

सन १९९४ चा महा. ३५.

२. (१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " विद्यापीठ अधिनियम " असा करण्यात आला आहे), यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलमे ४३ व ४४ यांच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही परिनियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून,—

(क) अशा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांच्या किंवा मंडळांच्या निवडून आलेल्या कोणत्याही सदस्यांची कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेली पदे भरण्यासाठी, विद्यापीठ अधिनियमाच्या अनुसूचीत नमूद केलेल्या विद्यापीठांमध्ये, प्रस्तावित नवीन विद्यापीठ कायद्याअन्वये नवीन प्राधिकरणे व मंडळे घटित करण्यात येईपर्यंत किंवा ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, कोणत्याही निवडणुका घेण्यात येणार नाहीत ;

(ख) विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळाद्वारे रिक्त पदांवर, विद्यापीठ अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींनुसार सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येईल ;

(ग) विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या रिक्त पदांवर, विद्यापीठ अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींनुसार सदस्यांना स्वीकृत करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ख) व (ग) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नामनिर्देशित व स्वीकृत केलेले सदस्य, प्रस्तावित नवीन विद्यापीठ कायद्याअन्वये नवीन प्राधिकरणे व मंडळे घटित करण्यात येईपर्यंत किंवा ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पद धारण करतील.

**स्पष्टीकरण.**—या अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ "प्रस्तावित नवीन विद्यापीठ कायदा" या वाक्यप्रयोगाचा अर्थ, महाराष्ट्र विद्यापीठ विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६) द्वारे प्रस्तावित अधिनियम असा आहे.

विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या व इतर मंडळांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याचे परिणाम.

३. विद्यापीठ अधिनियमामध्ये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही परिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त कालावधीमध्ये कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा इतर मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, अशा प्राधिकरणावरील किंवा मंडळावरील रिक्त होणारी पदे निवडणुकीद्वारे भरणे आवश्यक असून ती अशा प्रकारे भरण्यात आली नाहीत, केवळ या कारणावरून अवैध ठरणार नाही.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याचे निरसन.

सन २०१५ चा महा. २९.

४. महाराष्ट्र विद्यापीठ (विद्यापीठ प्राधिकरणाच्या व इतर मंडळाच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २०१५ याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

## निवेदन

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "विद्यापीठ अधिनियम" असा करण्यात आला आहे) यामध्ये, निवडून आलेल्या, नामनिर्देशित आणि स्वीकृत केलेल्या सदस्यांनी मिळून बनलेल्या, महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांची विविध प्राधिकरणे व मंडळे घटित करण्याची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ४२ (१) मध्ये, प्रत्येक प्राधिकरणाची मुदत १ सप्टेंबर रोजी सुरू होईल आणि सदस्याचा पदावर येण्याचा दिनांक कोणताही असला तरी तो विचारात न घेता, प्रत्येक प्राधिकरणाची मुदत ही पाच वर्षे इतकी असेल.

२. महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तंत्रज्ञानेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या आणि उच्च शिक्षणाचा आणि संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांना समर्थ बनविण्याच्या हेतूने, महाराष्ट्र शासनाने, सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ हे महाराष्ट्र विधानसभेत मांडले आहे आणि त्याद्वारे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ निरसित करण्याचे प्रस्तावित केले आहे. तथापि, विधानसभेने उक्त विधेयक राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविले आहे. संयुक्त समितीकडे पाठविलेले उक्त विधेयक २०१६ मधील राज्य विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विचारार्थ ठेवण्यात येईल अशी अपेक्षा आहे. नवीन कायदा अधिनियमित झाल्यावर अशा नवीन कायद्याच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची प्राधिकरणे व मंडळे घटित करणे आवश्यक असेल.

३. उक्त प्रस्तावित कायदा लक्षात घेता, महाराष्ट्र विद्यापीठ (विद्यापीठ प्राधिकरणांच्या व इतर मंडळांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २९) द्वारे ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत विद्यापीठाच्या प्राधिकरणांची व मंडळांची निवडणूक तात्पुरती पुढे ढकलली होती. नवीन कायदा अधिनियमित करण्याची प्रक्रिया, ३१ ऑगस्ट २०१६ पूर्वी पूर्ण होऊ न शकल्याने, विद्यार्थ्यांचे व्यापक हित लक्षात घेऊन, शासनाने, विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणुका पुढे ढकलणे आणि विद्यापीठाची कार्ये पार पाडण्यासाठी विद्यापीठ अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींनुसार नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीकरणाद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे तदर्थ घटित करणे शासनास इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; आणि, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २८ सप्टेंबर २०१६.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिताराम कुंटे,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.